पुण्य नगरी
■ बुधवार, २६ जून २०१३

# किडनी दान आणि प्रत्यारोपणासाठी जनजागृती हवी

■ मुंबई : आता कायद्याचा कोणताही अडथळा नाही.मात्र किडनी दान आणि प्रत्यारोपणाबाबत जनतेतच योग्य माहितीबाबत जनजागृती नाही. त्यामुळे अनेक रुग्णांना किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेअभावी आजाराला सामोरे जावे लागते. त्यामुळे ॲस्ट्रा या किडनी दान आणि प्रत्यारोपण नोंदणी केंद्राची गरज भासू लागली आहे. या केंद्राने गेल्याच आठवड्यात साखळी पद्धतीने किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करून भारतात प्रथमच या पद्धतीचा ठसा उमटवला आहे, अशी माहिती ॲपेक्स किडनी फाऊंडेशनचे अध्यक्ष आणि बॉम्बे रुग्णालयाचे डॉ. विश्वनाथ बिल्ला यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

किडनी रोपणाची शस्त्रक्रिया आणि कायद्याचा अडसर यापेक्षा किडनी मॅचिंग, रक्तगट, रुग्णाचे नाते, वय, नोंदणी. खर्च आणि तज्ज्ञ डॉक्टर या गोष्टी किचकट आहेत, मात्र ॲस्ट्राच्या वतीने ॲपेक्स फाऊंडेशनच्या मदतीने किडनी प्रत्यारोपण आणि दानाची प्रक्रिया सुलभ होणार आहे. त्यासाठी देशभर असलेल्या ॲपेक्स केंद्रावर जाऊन किडनी दान आणि प्रत्यारोपणधारकांनी रीतसर अर्ज भरावा, असे डॉ. बिल्ला यांनी सांगितले.मधुमेहाच्या आजाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांना किडनी निकामी होण्याचे प्रमाण जास्त आहे. त्या खालोखाल रक्तदानाच्या रुग्णांना याचा सामना करावा लागतो. या सर्व पार्श्वभूमीवर ॲपेक्स फाऊंडेशनने सुरू केलेला नवा साखळी अवयव दान प्रयोग मोलाची कामगिरी करू शकतो, असे डॉ. बिल्ला म्हणाले. या वेळी डॉ. जतीन कोठारी, डॉ. श्रीरंग बिच्चू, डॉ. गणेश सानप उपस्थित होते.